# पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर

दुरध्वनी क्रमांक ०२०-२६२०८३५६ फॅक्स क्रमांक ०२०-२६१२८१०५ ई-मेल estt1.cppune@gmail.com

जा.क्र.आस्था-३(७)/कंत्राटी पदे निविदा/२०२५ दिनांक. ०४/०२/२०२५

पोलीस आयुक्त कार्यालय पुणे शहर आस्थापनेवर सफाईगार-२९, कार्यालयीन शिपाई-२, भोजन सेवक-६, ड्रेसर-१, मोची-२, वार्डबॉय-४, हलालखोर-१ असे एकुण ४५ कर्मचाऱ्याच्या सेवा बाह्ययंत्रणेव्दारे (Out Sourcing) कंत्राटदारांमार्फत करुन घेण्यासाठी नोंदणीकृत आणि अनुभवी कंत्राटदाराकडुन विहीत नमुन्यात ऑनलाइन ई-निविदा मागविण्यात येत आहेत.

**निविदेचे वेळापत्रक**

| अ.क्र. | तपशिल | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| १ | ई-निविदा प्रसिध्द करणे | ०४/०२/२०२५ | स.११.०० |
| २ | ई-निविदा सादर करण्याचा दिनांक | ०४/०२/२०२५ | स.११.०० |
| ३ | ई-निविदा सादर करण्याचा अंतिम दिनांक | १६/०२/२०२५ | सायं.१८.०० |
| ४ | ई-निविदा पूर्व बैठक | ११/०२/२०२५ | स.११.०० |
| ५ | ई-निविदा उघडण्याची तारीख व वेळ (उपलब्धतेनुसार) | १७/०२/२०२५ | दु.१५.०० |

१) संपुर्ण ई-निविदा प्रक्रिया ऑनलाईन राबविण्यात येईल. ई-निविदे संबंधी सर्व सुचना व अटी शर्ती https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत.
२) ई-निविदा करीता आवश्यक सर्व कागदपत्रांची माहिती https://mahatenders.gov.in या वरील संकेत स्थळावर उपलब्ध असेल व सर्व संबंधितानी सदर संकेत स्थळावर ई-निविदा भराव्यात.
३) सदर निविदा करीता ई-निविदा फॉर्म फी -रुपये २५०००/- व बयाना रक्कम (EMD) रुपये २,५०,०००/- बँक गॅरंटी कार्यालयात सादर करावी लागेल.
४) प्राप्त निविदा कोणतीही कारणे न देता नाकारणे अथवा स्विकारण्याचे अधिकार पोलीस आयुक्त ,पुणे शहर यांनी राखून ठेवलेले आहेत.
५) ई-निविदेतील सर्व अटी व शर्ती ई-निविदाधारकास बंधनकारक राहतील.
६) कामगार विभाग, महाराष्ट्र शासन उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग यांनी वेळोवेळी जाहीर केलेल्या किमान वेतनांच्या दरांची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.

S/d
**(अरविंद चावरिया)**
अपर पोलीस आयुक्त (प्रशासन)
पुणे शहर

ठिकाण: पुणे

# पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर

---

**निविदा क्रं ०१/२०२५** **दिनांक. ०४/०२/२०२५**

**बाहययंत्रणेमार्फत मनुष्यबळ पुरविणा-या संस्थाकडुन पोलीस आयुक्तालय पुणे शहर अंतर्गत विविध कामकाज कंत्राटी (Out Sourcing) तत्वावर करुन घेण्यासाठी दरपत्रक मागविणेबाबत.**

पोलीस आयुक्त पुणे शहर व आयुक्तालयांतर्गत पोलीस स्टेशन व इतर कार्यालयाच्या इमारती तसेच भाडेतत्वावारील इमारती व त्यांच्या जागेच्या साफ सफाईसाठी व विविध कामकाजाकरीता नोंदणीकृत बाह्ययंत्रणा संस्थाकडुन ११ महिन्यांच्या कालावधीसाठी सेवा उपलब्ध करुन घेण्यासाठी स्थानिक कंत्राटदारांकडुन दि.०४/०२/२०२५ ते दि. १६/०२/२०२५ संध्याकाळी ०६.०० वाजेपर्यंत दरपत्रक मागविण्यात येत आहेत.

दरपत्रक सादर करणेसाठी सविस्तर तपशिल ,बाहययंत्रणेद्वारे मनुष्यबळ पुरविणा-या संस्थाकरिता तसेच कराराच्या आवश्यक अटी, शर्ती इ.विषयक तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

| अ | **पक्षकार** |
|---|---|
| | करारनाम्याचे पक्षकार हे कंत्राटदार (ज्यांना काम सोपविले आहे)आणि अपर पोलीस आयुक्त, पुणे शहर हे राहतील. व दक्षता अधिकारी म्हणून पोलीस आयुक्त, पुणे शहर हे राहील. |

| ब. | **बाह्यस्रोताव्दारे (Out Sourcing) मनुष्यबळ पुरवठा करणेची सेवा देणा-या संस्थेसाठी अटी व शर्ती** |
|---|---|
| १ | कंत्राटदार कार्यालयाच्या दैनंदिन कामाकरीता सफाईगार-२९, कार्यालयीन शिपाई-२, भोजन सेवक-६, ड्रेसर-१, मोची-२, वार्डबॉय-४, हलालखोर-१ असे एकुण ४५ कर्मचारी पुरवतील व त्यांच्या पदांचे काम करुन घेतील. |
| २ | कंत्राटदारास सदर कर्मचाऱ्यास किमान वेतन अधिनियम १९४८ कायदयानुसार दुकाने व व्यापारी आस्थापना उद्योग ह्या प्रकारातील अकुशल कामगाराकरिता वेतन देणे बंधनकारक राहील. |
| ३ | उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या सुधारीत अधिसुचना दि.२४.०७.२०१९ नुसार कंत्राटी किमान वेतनाचे दर सुधारीत करण्यात आलेले आहेत. तसेच विविध कामगार कायद्यान्वये वेळोवेळी निश्चित केलेल्या दरानुसार विशेष /महागाई भत्ता ,घरभाडे भत्ता, इतर भत्ते व वजावटी उदा.भविष्य निर्वाह निधी / राज्य कामगार विमा योजना /व्यावसायिक कर/ बोनस /कामगार कल्याण निधी या दायित्वांचा समावेश करुन एकुण किमान वेतन व भत्ते परिगणित करण्यात आलेले आहेत. त्यानुसार कंत्राटी कर्मच्या-यांना किमान वेतन ,व अनुषंगिक भत्ते प्रदान करणे तसेच नियमातील तरतुदीनुसार त्याबाबतची दायित्वे संबंधित प्राधिकरणाकडे भरणे बंधनकारक राहील. |
| ४ | वित्त विभाग, शासन परिपत्रकक्रमांक-जीएसटी -२०१७/प्र.क्रं ८१/कराधान-१ दि.१९.०८.२०१७ नुसार जीएसटी अधिनियमानुसार कराची आकरणी बंधनकारक आहे. |

| क. | **दरपत्रकासंबंधीच्या अटी व शर्ती** |
|---|---|
| | **अ.तांत्रिक लिफाफा- यामध्ये खालील प्रमाणे कागदपत्रे जोडण्यात यावी.** |
| १ | संबंधित संस्था /अर्जदार ही खालील पैकी एका कायदयाअंतर्गत नोंदणीकृत असावी (नोंदणी प्रमाणपत्राची प्रत सोबत जोडावी).<br>• मुंबई दुकाने व आस्थापना अधिनियम १९४८<br>• भागिदारी संस्था अधिनियम १९३२<br>• सहकारी संस्था अधिनियम १९६१<br>• कंपनी अधिनियम १९५६ |
| २ | **उदयोग,उर्जा व कामगार विभाग,शासन निर्णय क्रं भाखंस -२०१४/प्र.क्रं८२/भाग III/उदयोग-४. दि.०१.१२.२०१६ मधील प्रकरण क्रं ३/अ क्रं ३.१ व प्रकरण क्र ६.८परिशिष्ट ८ मधील तरतुदानुसार निविदा/ दरपत्रक अर्जासोबत निविदा शुल्क रु.२५,०००/- व बयाना रक्कम रु.२,५०,०००/- धनाकर्ष (राष्ट्रीयकृत बँकेंचा) आहरण व संवितरण अधिकारी यांनी प्राप्त निविदा शुल्क /बयाना रक्कम योग्य लेखाशिर्षाखाली जमा करुन पावती** |

| | |
|---|---|
| | **जोडणे बंधनकारक आहे.**<br>रोजगार व स्वयंरोजगार विभाग, शासन निर्णय क्रं रोस्वरो २००२/ प्र क्रं २६७/रोस्वरो-१, दि.१७.०८.२००२ मधील अ.क्रं. ८ अन्वये शासकीय किंवा निमशासकीय आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्यालयांमध्ये सेवेचा पुरावठाकरिता निविदा शुल्क/बयाणा रक्कम भरण्याच्या अटीतुन पंजीकृत बेरोजगारांच्या सहाकारी सेवा संस्थाना/ लोकसेवा केंद्राना सूट देण्यात आली आहे. तसेच उदयोग , उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय दि.०१.१२.२०१६ मधील प्रकरण क्रं ६ परिशिष्ट-८ नुसार शासकिय मंडळ/ महामंडळ/ उपक्रमांकांना तसेच सुक्ष्म व लधु ,मध्यम उपक्रमातंर्गत नोदणीकृत असलेले उत्पादक व पुरवठादार यांना निविदेमध्ये निविदा शुल्क व बयाणा रक्कम भरण्यापासुन सूट देण्यात आली आहे. त्यानुषंगाने आवश्यक प्रमाणपत्र सोबत जोडण्यात यावे. या व्यतिरिक्त अन्य शासन निर्णयातील तरतुदीनुसार अनामत रक्कम भरण्यापासुन सूट मिळण्याची अट या निविदेस लागू होत नसल्याने त्याअंतर्गत मोडणा-या संस्थांना अनामत रक्कम भरणे अनिवार्य असेल. |
| ३ | आयकर अधिनियमाप्रमाणे दरमहा अदा होणा-या देयकामधुन नियमानुसार आयकर वजा करण्यात येईल. यासाठी पॅनकार्डची छायांकित प्रत जोडण्यात यावी. |
| ४ | मागील सन २०२०,२१, २०२१-२२, २०२२-२३, २०२३-२४, २०२४-२५ या ५ आर्थीक वर्षाचे आयकर भरणा केल्याचे प्रमाणपत्र जोडण्यात यावे. |
| ५ | वस्तु व सेवाकर कायदा ,२०१७ नुसार नोदंणीकृत असल्याचे प्रमाणपत्र व क्रमांक जोडण्यात यावे. तसेच शेवटचे तिमाहीत GST भरल्याचे चलन जोडणे बंधनकारक आहे. |
| ६ | कंत्राटी कर्मचा-याच्या वेतनातुन भविष्य निर्वाह निधी /राज्य कामगार विमा योजना (इपीएफ/एसईआयएस) अंतर्गत वर्गणी वजा करण्यात येत असल्याचे शेवटच्या तिमाहीचे चलन जोडणे बंधनकारक आहे. |
| ७ | मागील **१०** वर्षाचा कामाचा अनुभव व किमान **५** शासकिय /निमशासकिय कार्यालयांना सफाईगार कंत्राटी तत्त्वावर पुरविल्याबाबत कामाचे आदेश व त्यांचे काम समाधानकारक असल्याचे संबंधित कार्यालयाचे प्रमाणपत्र जोडण्यात यावे. सदर कामगार पुरविण्यात आलेल्या कंत्राटदारांनाच पात्र टरविण्यात येईल. |
| ८ | संस्थेची वार्षिक उलाढाल ही मागील **०५** वर्षासाठी दरवर्षी **१०** कोटीपेक्षा कमी नसावी. तसेच सनदी लेखापालांकडुन प्रमाणित करण्यात आलेल्या मागील दोन वर्षाच्या ताळेबंदाच्या प्रती निविदा अर्जासोबत जोडण्यात याव्यात. |
| ९ | नजीकच्या कालावधीमध्ये जीएसटी भरल्याबाबतची संबंधित विभागाकडील चलनाची प्रत जोडण्यात यावी. |
| १० | नजीकच्या कालावधीमध्ये व्यवसायकर भरल्याबाबतची संबंधित विभागाकडिल चलनाची प्रत जोडण्यात यावी. |
| ११ | निविदा अटी व शर्ती निविदाधारकास मान्य असल्याचे प्रमाणपत्र सादर करावे. |
| १२ | संस्थेचे नाव काळया यादीत समाविष्ट नसल्यबाबतचे ,संस्थेविरोधात पोलीस चौकशी /तपास / न्यायालयीन प्रकरणे चालू नसल्याचे हमीपत्र संस्थेच्या चालकांचे सहीनिशी जोडण्यात यावे. |
| १३ | प्रोफेशनल टॅक्स भरत असल्यावाबतचे प्रमाणपत्र जोडण्यात यावे. |
| १४ | निविदाकार कंपनीचे व भागीदार यांचे पुर्ण नाव पत्ता दुरध्वनीसह वर नमुद केलेली सर्व कागदपत्र सादर करण्यात यावीत. कंत्राटदाराने निविदा अर्जासोबत सदर प्रमाणपत्र सादर न केल्यास अर्ज निविदा प्रक्रियेतून बाद टरविण्यात येईल. |
| १५ | कंत्राटाचा कालावधी कमी करण्याचे अथवा कंत्राट रद्द करण्याचे अधिकार पोलीस आयुक्त कार्यालय पुणे शहर यांचेकडे राखुन ठेवण्यात येतील. |
| १६ | गट-ड संवर्गातील अतिरिक्त २१० सफाईगार व ५९ कार्यालयीन शिपाई अशी २६९ वाढीव पदे मंजूरीबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आलेला आहे. सदर पदे मंजूर झालेस सध्या भरण्यात येणारे कर्मचाऱ्यांची संख्या वाढवण्याची शक्यता असल्याने बाह्ययंत्रणेमार्फत भरण्यात येणारे कर्मचाऱ्यांची सख्या वाढवण्याचे किंवा कमी करण्याचे अधिकारी पोलीस आयुक्त पुणे शहर कार्यालयाकडे राखुन ठेवण्यात येत आहेत. |
| १७ | सदर निविदेबाबत काही तक्रार असलेस शा.नि.दि.०१/१२/२०१६ मधील नियम ५.७.२ नुसार सदर निविदाकार/ पुरवठादार किंवा संभाव्य निविदाकार तक्रार निवारणासाठी अनुज्ञेय वेळ संपल्यानंतर किंवा निर्णय प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून पंधरा (१५) दिवसांचे आत, जसे असेल तसे, निविदा समितीपुढे अर्ज दाखल करु शकेल.<br>तक्रार निवारण्यासाठीचा प्रत्येक अर्ज हा विहित करण्यात येईल अशा नमुन्यात आणि रितीने आणि त्यासोबत **रुपये पन्नास हजाराचा (रु.५००००/-)** डिमांड ड्राफ्ट शुल्क म्हणून पाठवेल. हे शुल्क जर गाऱ्हाणे खरे असल्याचे आढळून आले तर परत करण्यात येईल. तथापी गाऱ्हाणे जर खोटे असल्याचे आढळून आले तर ही रक्कम जप्त करण्यात येईल. |
| | **ब. व्यापारी लिफाफा** |
| १ | सफाईगार-२९, कार्यालयीन शिपाई-२, भोजन सेवक-६, ड्रेसर-१, मोची-२, वार्डबॉय-४, हलालखोर-१ असे एकुण ४५ कर्मचारी पदांसाठी किमान वेतन अधिनियम १९४८ कायदयानुसार दुकाने व व्यापारी आस्थापना उदयोग हया |

| | |
|---|---|
| | प्रकारातील त्या पदांच्या वर्गीकरणानुसार अकुशल अर्धकुशल व कुशल कामगारांकरिता वेतन देणे बंधनकारक राहील. |
| २ | वाणिज्य आणि उद्योग मंत्रालय, भारत सरकार यांचेकडील पत्र No.३१७/१४/१०००/२०१४.GA Dated-१७/०९/२०१४ अन्वये किमान १ टक्के पेक्षा कमी सेवाकर आकारणाऱ्या संस्था अपात्र असतील. |
| ३ | उदयोग उर्जा व कामगार विभागाच्या सुधारीत अधिसुचना दि.२४.०७.२०१९ नुसार व किमान वेतन अधिनियमातील तरतुदीनुसार दयावयाच्या मासिक परिश्रमिक रक्कम दिलेल्या विहित नमुन्यात सादर करावी. याबाबतचा सविस्तर तपशिल कंत्राट मान्य झाल्यानंतर कंत्राटदाराकडुन पोलीस आयुक्त पुणे शहर कार्यालयास सादर करावा. |
| ४ | कंत्राटदाराने/पुरवठादाराने वरील किमान वेतनानुसार मासिक परिश्रमिक दर अदा करावे. |
| ५ | कंत्राटदार /पुरवठादाराचे मान्य दर हे कार्यारंभ आदेश दिल्याच्या तारखेपासुन ११ महिन्यांसाठी लागू राहतील. दर कराराच्या कालावधीत कोणतीही दरवाढ मंजुर केली जाणार नाही. |

| **ड** | **ई-निविदा छाननीबाबत.** |
|---|---|
| १ | कंत्राटदाराने /पुरवठादाराने नमुद केलेले दर हे ई-निविदा उघडण्याच्या तारखेपासुन ९० दिवसांच्या कालावधीपर्यंत वैध/विधीग्राहय असतील. |
| २ | **ई-निविदा दिनांक. १७/०२/२०२५ रोजी दुपारी ०३ वाजता उघडण्यात येतील. तांत्रिक दरपत्राकामध्ये पात्र ठरलेल्या पुरवठादाराचेच लिफाफे उघडण्यात येतील.** |
| ३ | तांत्रिक दरपत्रक उघडल्यानंतर दरासंबंधीचे लिफाफे उघडण्यास काही अडचणी आल्यास दरपत्रकाचा लिफाफा उघडला जाणार नाही. किमान ३ वैध दरपत्रके असतील तरच दराचा लिफाफा उघडण्यात येईल. |
| ४ | प्राप्त झालेले दर हे बाजारातील प्रचलित दरापेक्षा अवास्तव वा जास्त असणार नाहीत. |
| ५ | शासनाने ठरवुन दिलेल्या कार्यपध्दतीनुसार दरपत्राके छाननीबाबत अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार कंत्राट मूल्याप्रमाणे संबंधित समितीकडे किंवा पोलीस आयुक्त कार्यालय पुणे शहर यांचेकडे राखून ठेवण्यात येतील. सदर निर्णय कंत्राटदारावर /पुरवठादारावर यांना मान्य करणे बंधनकारक राहील. |

| **इ.** | **पात्र कंत्राठदाराने/पुरवठादाराने करावयाच्या कार्यवाहीबाबत.** |
|---|---|
| १ | उदयोग उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रं भांखस -२०१४/प्र.क्रं८२/ भाग III /उदयोग -४ दि.०१.१२.२०१६ मधील प्रकरण क्रं ४/ इ क्रं ४.६ मधील तरतुदीनुसार निविदा मान्य झालेल्या कंत्राटदारास /पुरवठादारास निकाल कळविल्यानंतर १५ दिवसांच्या आंत सुरक्षा ठेव **अनामत (Performance Security Deposit) रुपये-४,००,०००/-** चा मुख्यालयाच्या ठिकाणी प्रदेय असणारा राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष (डीमांड ड्राफ्ट) पोलीस आयुक्त ,पुणे याचे नावे दयावे लागेल. विहित मुदतीत सुरक्षा ठेव अमानत जमा न केल्यास विहित नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल. आहरण व संवितरण अधिकारी, पोलीस आयुक्त कार्यालय पुणे शहर यांनी प्राप्त सुरक्षा ठेव रक्कम योग्य लेखाशिर्षाखाली जमा करावे. |
| २ | पात्र कंत्राटदाराने /पुरवठादाराने कामाचे आदेश देण्यापुर्वी रु.५००/-चे मुद्रांक पेपर वर करारनामा करुन देणे आवश्यक राहील. |
| ३ | करारनामा केल्यानंतर कंत्राटदाराने दिलेल्या विहित मुदतीत आवश्यकतेप्रमाणे मनुष्यबळ पुरवठा न केल्यास खालील प्रमाणे विहित नियमानुसार विलंब आकार /दंड आकारला जाईल.<br>● कामगाराचे कामाचे वेळापत्रक न पाठवणे (प्रतिदिन)- १०००/-<br>● असमाधानकारक काम (प्रतिदिन)- २०००/-<br>● साफसफाई व इतर आवश्यक साहित्याचा अपुरा पुरवठा (प्रतिदिन)-१०००/-<br>● कंत्राटी कर्मचारी यांचे गैरवर्तन (प्रती कर्मचारी प्रतिदिन)-१०००/-<br>● कंत्राटी कर्मचारी यांना त्यांचे पदांनुसार ठरवून दिलेले कामकाज सुरळीत पार न पाडणे(प्रतिदिन)-१०००/-<br>सदर दंडाची वसुली प्रशासकिय सेवा आकार किंवा सुरक्षा ठेव अनामत रक्कमेतुन करण्यात येईल. |
| ४ | कंत्राटदाराकडून /पुरवठादाराकडुन करारनाम्यातील कोणत्याही अटींचे उल्लंघन झाल्यास कामाचे आदेश रद्द करण्यात येतील व त्याला कोणतीही रक्कम प्रदेय राहणार नाही. जमा केलेली सुरक्षा ठेव अनामत रक्कम जप्त केली जाईल. |
| ५ | करारनाम्याच्या कालावधीत कोणतीही तक्रार प्राप्त न झाल्यास ,करारनाम्याचा कालावधी पुर्ण झाल्यानंतर अथवा करारनामा संपुष्टात आल्यानंतर सदर अनामत रक्कम मुक्त करण्यात येईल. |

| | |
|---|---|
| ६ | पोलीस आयुक्त कार्यालय ,पुणे यांना कोणत्याही वेळी कोणतेही कारण न दर्शविता निविदाधारकास १ महिन्याची आगाउ नोटीस देवुन करारनामा रद्द करण्याचा /संपुष्टात आणण्याचा अधिकार असेल. |

| | |
|---|---|
| **ई.** | **मासिक परिश्रमिक अदा करण्याबाबतची कार्यपध्दती.** |
| १ | मनुष्यबळ पुरवठा केल्यानंतर पोलीस आयुक्त कार्यालय ,पुणे शहर यांचेकडुन रुजु झाल्याबाबतचे आदेश निर्गमित करण्यात येईल. संबंधित उमेदवारांना ज्या कार्यालयात/पोलीस मुख्यालय/पोलीस स्टेशन येथे नेमण्यात आले आहे तेथे त्याची बायेमॅट्रिक मशीनमध्ये अथवा हजेरीपटावर नोंद घेतील. |
| २ | पोलीस आयुक्त कार्यालयातील बिल्डींग जमादार/पोलीस मुख्यालयातील लाईन दफेदार, मेस इंचार्ज व इतर कार्यालयातील कार्यालय प्रमुख व पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी तसेच वैद्यकीय अधिकारी यांनी प्रत्येक महिन्याच्या कार्यालयीन कामकाजाच्या शेवटच्या दिवशी पोलीस आयुक्त कार्यालयामध्ये त्यांचेकडील कंत्राटी कर्मचा-याचे उपस्थिती प्रमाणपत्र कंत्राटदार /पुरवठादार यांचेकडे पाठविणे आवश्यक राहील. |
| ३ | कार्यालय प्रमुख/बिल्डींग जमादार/लाईन दफेदार/डे बुक/मेस कमांडर यांनी कार्यालयातील नियमित सफाईगार व कंत्राटी सफाईगार कर्मचा-यांच्या कामकाजावर नियंत्रण ठेवावे. |
| ४ | पोलीस आयुक्त पुणे शहर कार्यालयाच्या नियंत्रणाखाली असलेल्या कंत्राटी कामगारांचे मासिक परिश्रमिक देयक त्या त्या कार्यालयात कंत्राटदाराने/ पुरवठादाराने उपस्थिती प्रमाणपत्राच्या प्रतीसह महिन्याच्या ०५ तारखेपर्यंत सादर करावे. देयक पारित झाल्यानंतर संबंधित कंत्राठदार/ पुरवठादार यांना ई प्रदान (NEET/ECS/RTGS) संबंधित कार्यालयामार्फत करण्यात येईल.<br>कंत्राटदारास/ पुरवठादारास बाह्ययंत्रणेमार्फत पुरविण्यात येणाऱ्या कंत्राटी कर्मचाऱ्यास मासिक परिश्रमिक त्यांच्या बँक खात्यामध्ये अदा केल्याचा पुरावा संबंधित संस्थेस रोखपाल पोलीस आयुक्त कार्यालय पुणे शहर यांचेकडे प्रत्येक महिन्यात सादर करावा लागेल, त्यानंतरच पुढील महिन्याचे वेतन संस्थेस अदा करण्यात येईल. |
| ५ | कंत्राटदारास देयक सादर करण्यास विलंब झाला तरी देखील मासिक परिश्रमिक कंत्राटदाराने/ पुरवठादाराने प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेपर्यत संबंधित उमेदवाराच्या बँक खात्यावर रेखांकित धनादेशाद्वारे (Account Payee Cross Cheque) NEET/ECS/RTGS द्वारे जमा करणे आवश्यक राहील. |
| ६ | कंत्राटदाराने /पुरवठादाराने कंत्राटी कर्मचा-यास दिलेल्या परिश्रमिकाच्या/ इतर भत्त्यांच्या प्रदानाबाबतची छायांकित प्रत दरमहा सादर केल्याशिवाय कंत्राटदाराला/पुरवठादाराला पुढील महिन्याचे देयक अदा केले जाणार नाही. |
| ७ | कंत्राटदाराने/पुरवठादाराने कंत्राटी उमेदवारास मासिक वेतनचिठ्ठी देणे आवश्यक राहील. |
| ८ | कंत्राटदाराने/पुरवठादाराने कंत्राटी कर्मचा-यास किमान वेतन कायदयातील तरतुदीपेक्षा कमी वेतन दिल्यास अथवा दायित्वाची रक्कम ठरलेल्या दराप्रमाणे कपात करुन संबंधित प्राधिकारणाकडे जमा न केल्यास अथवा संबंधित उमेदवाराकडुन ज्यादा रक्कम घेल्याबाबतची तक्रार प्राप्त झाल्यास व तसे पुरवे आढळल्यास संबंधित कंत्राटदार/पुरवठादार किमान वेतन कायदयातील तरतुदीप्रमाणे कारवाईस पात्र असेल. |
| ९ | कंत्राटदारास /पुरवठादारास रक्कम अदा करताना आयकर व वस्तु व सेवाकर (GST) कायदयातील तरतुदीनुसार आयकराची/ वस्तु व सेवाकरची रक्कम कपात करुन उर्वरित रक्कम अदा केली जाईल. वस्तु व सेवाकर (GST) २०१७ व महाराष्ट्र वस्तु व सेवा कर कायदयाअंतर्गत अधिसूचना क्र ५०/२०१८ मधील तरतुदीनुसार वस्तु व सेवा विषयक एका संविदाखालील मूल्य रु.२,५०,०००/- पेक्षा अधिक असेल अशा करपात्र वस्तु किंवा सेवा यांच्या पुरवठ्यासाठी प्रदान करण्यात येणाऱ्या रक्कमेतुन विहित दरानुसार कपात करण्याचे आहरण व संवितरण अधिकारी, पोलीस आयुक्त कार्यालय ,पुणे यांना बंधनकारक राहील. तसेच याबाबत शासनाकडुन वेळोवळी लागु करण्यात आलेल्या नियमांप्रमाणे कार्यवाही करणे बधनकारक राहील. |
| १० | व्यवसाय कर भरण्याची जबाबदारी संबंधित कंत्राटदार/पुरवठादार यांचे राहील. |
| ११ | उदयोग, उर्जा व कामगार विभागचे शासन परिपत्राक क्रं संकिर्ण २०१९/ प्र.क्र.१३/ कामगार-८ दि.२२.०२.२०१९ नुसार कंत्राटी कर्मचा-यास अदा करण्यासंबंधिच्या "जोडपत्र अ" मधील तरतूदी कंत्राटदारास /पुरवठादारास बंधनकार राहतील . |
| १२. | आहरण व संवितरण अधिकारी, पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे यांचेमार्फत कंत्राटदारास मासिक परिश्रमिकाची अदायगी होणार असल्यामुळे दायित्व नियमातील तरतुदीनुसार जमा केले जात असल्याबाबतची खातरजमा त्यांचे स्तरावरुन करणे आवश्यक राहील. करारनामा समाप्त झाल्यानंतर कंत्राटदारास सुरक्षा ठेव अमानत अदा करण्याबाबतचे ना हरकत प्रमाणपत्र पोलीस आयुक्त कार्यालय पुणे यांचेकडे सादर केल्यानंतर अनामत रक्कम अदा करण्याबाबतचे आदेश निर्गमित करण्यात येतील. |

| फ | **बाहययंत्राणेमार्फत मनुष्यबळ पुरविणा-या संस्थासाठी अटी व शर्ती** |
|---|---|
| १ | कंत्राटी कर्मचारी उमेदवाराची कंत्राटी सेवा चालु ठेवण्याचे/संपुष्टात आणण्याचे सर्व अधिकार पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे यांचे स्वाधीन राहतील. |
| २ | कंत्राटी कर्मचारी वेळेवर कार्यालयात उपस्थित न झाल्यास किंवा विनापरवानगी गैरहजर राहील्यास त्याचे त्या दिवसाचे वेतन अदा करण्यात येणार नाही. |
| ३ | कंत्राटी कर्मचारी रजेवर असल्यास पर्यायी कामगार पुरविणे बंधनकारक राहील. |
| ४ | कंत्राटी कर्मचा-यास सचोटी/चारित्र्याबाबतचे पोलीस खात्याचे प्रमाणपत्र हजर झाल्यावर सादर करावे लागेल. |
| ५ | कंत्राटी कर्मचा-यास त्यांचे पदांनुसार आवश्यक शारिरीक व शैक्षणिक पात्रता तसेच मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे. |
| ६ | नियुक्त केलेल्या कंत्राटी कर्मचा-यांना गणवेश तसेच सुरक्षा उपाययोजना इत्यादी साहित्य कंत्राटदारानेच पुरविणे अनिवार्य राहील. |
| ७ | कंत्राटदाराचे कर्मचारी कार्यालयात गणवेशातच तसेच त्यांच्या संस्थेच्या ओळखपत्रासहित कार्यालयात उपस्थित राहतील याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराने घ्यावी. |
| ८ | **कर्मचा-यांच्या कामाच्या वेळा कार्यालयाच्या गरजेनुसार ठरविण्यात येतील.त्यानुसार कंत्राटदाराने सर्व कर्मचारी संबंधित कार्यालयात पुर्णवेळ हजर राहतील ही जबाबदारी कंत्राटदाराची राहील.** |
| ९ | इमारतीच्या साफसफाई करिता लागणा-या सर्व वस्तु/साधनसामुग्री याबाबतचा सर्व पुरवठा व त्यावर होणारा खर्च कंत्राटदार करतील. कंत्राटदाराने खालील नमुद साहित्य नियमितपणे पुरविणे अनिवार्य आहे.<br>१. हात धुण्यासाठी द्रावण<br>२. झाडु, फुलझाडु<br>३. केरसुणी/खराटा<br>४. चांगल्या प्रतीचे ब्लिचिंग पावडर<br>५. चांगल्या प्रतीचे फिनाईल<br>६. रबराचे Water Remover Pad<br>७. लादी पुसणी<br>८. टॉयलेट क्लिनर Stain Remover<br>९. डांबरगोळया<br>१०. टॉयलेट ब्रश<br>११. डस्टबीन<br>१२. कचरा गोळा करण्यासाठी मोठया आकाराच्या गोण्या<br>१३. उंदिरनाशक व किटकनाशक फवारणी<br>१४. कंत्राटी कर्मचा-यासाठी हॅन्ड ग्लोव्हज |
| १० | कंत्राटी कामगार कायमस्वरुपी शासकिय नोकरीसाठी कार्यालयाकडे/शासनाकडे/न्यायालयाकडे दावा अथवा खटला करणार नाही.अशा आशयाचे हमीपत्र सेवेत हजर होताना सादर करणे बधनकारक . |
| ११ | कोणतेही दरपत्रक स्विकारण्याचा किंवा कारण न देता नाकारण्याचा हक्क पोलीस आयुक्त कार्यालय पुणे यांचेकडे राहील. |

वर नमुद अटी व शर्तीची पुर्तता करणा-या बाहययंत्रणेच्या संस्थेकडुन पोलीस आयुक्त कार्यालय ,पुणे शहर व त्याअंतर्गत कार्यालये, पोलीस मुख्यालय व पोलीस स्टेशन येथे दैनंदिन कामासाठी सफाईगार-२९, कार्यालयीन शिपाई-२, भोजन सेवक-६, ड्रेसर-१, मोची-२, वार्डबॉय-४, हलालखोर-१ असे एकुण ४५ कर्मचारी पुरवतील कामगारांच्या ११ महिन्यांकरिता सेवा घेण्यासाठी दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

दरपत्रक अर्ज दिनांक १६/०२/२०२५ पर्यत https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध राहील.

S/d

(अरविंद चावरिया)

**अपर पोलीस आयुक्त (प्रशासन)**

**पुणे शहर**

ठिकाण- पुणे

दिनांक ०४/०२/२०२५

## बाहय यंत्रणेद्वारे (Out sourcing) भरावयाची पदे खालीलप्रमाणे

| अ क्र | पदनाम | बाहय यंत्रणेद्वारे भरावयाची पदे | पात्रता/ अटी शर्ती |
|---|---|---|---|
| १ | सफाई कामगार | २९ | **१) वयोमर्यादा** : यशस्वी कंत्राटदाराने पुरविलेल्या उमेदवाराच्या बाबतीत ज्याचे वय १८ वर्षापेक्षा कमी व ४३ वर्षापेक्षा जास्त नसावे तसेच चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र जोडावे.<br>**२)शैक्षणिक अर्हता**: लिहिता वाचता आले पाहीजे. सदर पदाचे कामाचा ५ वर्षाचा अनुभव असावा.<br>**कामाचे स्वरुप -** १)उमेदवाराला शौचालय स्वच्छतेचा, झाडू कामाचातसेच कार्यालय परिसर स्वच्छतेचा पुरेसा अनुभव असावा. परिशिष्ट-अ मधील कामे करणे.<br>२)कार्यालय प्रमुख/शाखा प्रमुख यांनी सांगीतलेली सर्व कामे करणे. |
| २ | कार्यालयीन शिपाई | ०२ | **१) वयोमार्यादा** :- यशस्वी कंत्राटदाराने पुरविलेल्या उमेदवाराच्या बाबतीत ज्याचे वय १८ वर्षापेक्षा कमी व ४३ वर्षापेक्षा जास्त नसावे तसेच चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र जोडावे.<br>**२)शैक्षणिक अर्हता**:- माध्यमिक शालांत प्रमाणपत्रा परिक्षा उत्तीर्ण केली आहे. सदर पदाचे कामाचा ५ वर्षाचा अनुभव असावा<br>**कामाचे स्वरुप** :- i)वरिष्ट पोलीस अधिकारी यांचे कक्ष, विविध शाखा, कार्यालय येथील नेमून दिलेले कामकाज करणे<br>ii)कार्यालयातील टपाल ने-आण करणे,<br>iii)कार्यालयातील कार्यालयीन शिपाई बाबतचे कामकाज करणे.<br>iv)कार्यालय प्रमुख/शाखा प्रमुख यांनी सांगीतलेली सर्व कामे करणे |
| ३. | भोजन सेवक | ०६ | **१) वयोमर्यादा** : यशस्वी कंत्राटदाराने पुरविलेल्या उमेदवाराच्या बाबतीत ज्याचे वय १८ वर्षापेक्षा कमी व ४३ वर्षापेक्षा जास्त नसावे तसेच चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र जोडावे.<br>**२)शैक्षणिक अर्हता**: ज्या व्यक्तीने फुड आणि बेवरेज सर्व्हिस असिस्टट (food and Beverges Service Assisatant ) किंवा फुड प्रोडक्शन (जनरल) food Production (General) या एक वर्षाचा व्यवसायिक अभ्यासक्रम पुर्ण केल्यानंतर राष्ट्रीय व्यवसायिक शिक्षण व प्रशिक्षण संस्थेने दिलेले प्रमाणपत्र प्राप्त केलेले आहे. सदर कामाचा ५ वर्षाचा अनुभव असावा.<br>**३) कामाचे स्वरुप :- i)**प्रमुख स्वयंपाकी/सहायक स्वयंपाकी यांना मदत करणे व नेमुन दिलेल्या ठिकाणी अनुषंगीक कामकाज करणे.<br>**ii)**पोलीस मुख्यालय येथे प्रशिक्षणार्थींचे भोजन तयार करणेकामी मतद करणे.<br>**iii)**पोलीस आयुक्त, पोलीस सह आयुक्त, अपर पोलीस आयुक्त, पोलीस उप आयुक्त यांचे दालन अथवा नेमुन दिलेल्या ठिकाणी भोजन सेवकाचे कामकाज पार पाडणे.<br>**iv)**भोजन सेवक पदाचे अनुषंगाने नेमुन दिलेले इतर संबंधित कामकाज करणे.<br>**v)**कार्यालय प्रमुख/शाखा प्रमुख यांनी सांगीतलेली सर्व कामे करणे |
| ४ | ड्रेसर | १ | **१) वयोमर्यादा** : यशस्वी कंत्राटदाराने पुरविलेल्या उमेदवाराच्या बाबतीत ज्याचे वय १८ वर्षापेक्षा कमी व ४३ वर्षापेक्षा जास्त नसावे तसेच चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र जोडावे.<br>**२)शैक्षणिक अर्हता**: माध्यमिक शालांत प्रमाणपत्रा परिक्षा उत्तीर्ण |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | केली आहे. सदर पदाचे कामाचा ५ वर्षाचा अनुभव असावा.<br>**कामाचे स्वरुप** -१) डॉक्टरांच्या आदेशानुसार संबंधित ड्रेसर पदाचे कर्तव्य पार पाडणे. |
| ५ | मोची | २ | **१) वयोमर्यादा** : यशस्वी कंत्राटदाराने पुरविलेल्या उमेदवाराच्या बाबतीत ज्याचे वय १८ वर्षापेक्षा कमी व ४३ वर्षापेक्षा जास्त नसावे तसेच चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र जोडावे.<br>**२)शैक्षणिक अर्हता**: मोची संबंधातील सर्व कामाचा अनुभव असावा, माध्यमिक शालांत प्रमाणपत्रा परिक्षा उत्तीर्ण केली आहे. सदर पदाचे कामाचा ५ वर्षाचा अनुभव असावा<br>**कामाचे स्वरुप** -१) पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे बुट दुरुस्ती करणे, शिलाई करणे. २) पोलीस अधिकारी, अंमलदार यांचे शासकीय बुट पॉलीश, बेल्ट पॉलीश, ड्रेस चे क्रॉसबेल्ट, सोल्ड इ. पॉलीश व दुरुस्ती संबंधित मोची पदाचे अनुषंगाने आवश्यक ते कामकाज करणे. ३)कार्यालय प्रमुख/शाखा प्रमुख यांनी सांगीतलेली सर्व कामे करणे |
| ६ | वार्डबॉय | ४ | **१) वयोमर्यादा** : यशस्वी कंत्राटदाराने पुरविलेल्या उमेदवाराच्या बाबतीत ज्याचे वय १८ वर्षापेक्षा कमी व ४३ वर्षापेक्षा जास्त नसावे तसेच चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र जोडावे.<br>**२)शैक्षणिक अर्हता**: माध्यमिक शालांत प्रमाणपत्रा परिक्षा उत्तीर्ण केली आहे. सदर पदाचे कामाचा ५ वर्षाचा अनुभव असावा<br>**कामाचे स्वरुप** -डॉक्टरांच्या आदेशानुसार पोलीस दवाखान्यातील वॉर्डबॉयची सर्व कामे करणे बंधनकारक राहील. तसेच कार्यालय प्रमुख/शाखा प्रमुख यांनी सांगीतलेली सर्व कामे करणे. |
| ७ | हलालखोर | १ | **१) वयोमर्यादा** : यशस्वी कंत्राटदाराने पुरविलेल्या उमेदवाराच्या बाबतीत ज्याचे वय १८ वर्षापेक्षा कमी व ४३ वर्षापेक्षा जास्त नसावे तसेच चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र जोडावे.<br>**२)शैक्षणिक अर्हता**: पुणे शहरातील अपघात किंवा लावारीस मृत्यु झालेल्या व्यक्तीची डेड बॉडी घेउन येणेबाबतचा अनुभव असावा. तसेच कार्यालय प्रमुख/शाखा प्रमुख यांनी सांगीतलेली सर्व कामे करणे |

**परिशिष्ट -अ**

## पोलीस आयुक्त कार्यालय पुणे शहर येथील जागेच्या साफसफाईसाठी कामासंबंधीचे विवरण

| अ क्रं | कामाबाबतचे तपशिल | कामाची वारंवारिता | काम करण्याचे स्वरुप |
|---|---|---|---|
| १ | फरशी,लॉबीच्या स्वच्छतेबाबत | दररोज दिवसातुन एकदा | झाडणे,डिटर्जंट/फिनाईल वापरुन सयाफ करणे व कोरडया कपडयाने पुसून घेणे |
| २ | वॉश बेसिन,प्रसाधन गृहे (सर्व) | दररोज दिवसातुन तीनदा | कार्यालयतील प्रसाधनगृहे डिटर्जंट व फिनेल वापरुन दिवसातुन तीन वेळा म्हणजे सकाळी ९.३० पुर्वी,दुपारी १.०० पुर्वी व सायकाळी ४.०० पुर्वी साफ करणे.<br>सर्व प्रसाधनगृहात डांबर गोळया टाकणे ,दिवसातुन तीन वेळा लिक्विड साबण ठेवणे,चोकअप काढणे |
| ३ | खिडक्यांच्या लोखंडी जाळया, खिडक्यंची चौकट, काचा ,पंखे व दरवाजे, प्रसाधगृहे, अग्निशामक नळकांडया | आठवडयातुन एका ठराविक दिवशी | ओल्या कापडाने स्वच्छ करुन कोरड्या कपड्याने पुसून घेणे |
| ४ | अधिकारी/कर्मचारी यांचे टेबल संगणक सामुग्री इ. | दररोज दिवसातून एकदा | कार्यालयीन वेळेपुर्वी डस्टरचा वापर करुन स्वच्छ ठेवावे |
| ५ | कार्यालयातील भिंती, स्तंभ, मोकळी जागा इ. | आठवडयातून ठराविक दिवशी | झाडुन धूळ, जाळे काढुन स्वच्छ करणे. |
| ६ | कच-याची विल्हेवाट | दररोज दिवसातुन एकदा | जमा झालेल्या कच-याची विल्हेवाट लावणे |
| ७ | अधिकारी वर्गाच्या तसेच कार्यालयीन पार्टीशनच्या काचा, दरवाजे, फोटो फ्रेम्स,खिडक्यांच्या काचा /तावदाने तसेच अधिकारी वर्ग दालनांचे अंतर्गत पार्टीशन्स ,कर्मचारी/अधिकारी यांच्या खुर्च्या | आठवडयातुन एकदा | ग्लास क्लिनींग किटचा वापर करुन स्वच्छ ठेवावी |
| ८ | टयुब लाईटस ,इलेक्ट्रिक बल्ब | महिन्यातुन एकदा | स्पंज किट/डस्टरचा वापर करुन स्वच्छ ठेवावी. |
| ९ | ड्रनेज लाईन | वेळोवेळी पहाणी करुन | पोलीस कार्यालये तसेच पोलीस लाईनीतील ड्रनेज लाईनची वेळोवेळी पहाणी करुन लाईन चॉकअप होणार नाही हे पहावे |

**उपरोक्त सर्व कामे कार्यालयीन कामकाजच्या दिवशी करणे शक्य नसल्यास कार्यालयाच्या आदेशानुसार सुटटीच्या दिवशी उपस्थित राहुन पूर्ण करावी लागेल.**

## तांत्रिक लिफाफा

| | | |
|---|---|---|
| १ | कंत्राटदारचे संस्थेचे/कंपनीचे नाव व पुर्ण पत्ता | |
| | पुणे परिक्षेत्रातील कार्यालयाचा तपशिलवार पता | |
| २ | संस्था/ कंपनी/ फर्म असल्यास | |
| | नोंदणीचा तपशिल | |
| | अ) कंत्राटदाराचा/संस्थेचा/कंपनीचा संपूर्ण पत्ता | |
| ३ | संपर्काचा तपशिल | |
| | अ) दूरध्वनी क्रमांक | |
| | ब) भ्रमणध्वनी | |
| | क) ईमेल आयडी | |
| ४ | दुकान परवाना क्रंमांक/प्रमाणपत्रा (नुतनीकरणासह) | |
| ५ | EPF रजिस्ट्रेशन क्रंमाक | |
| ६ | ESIC रजिस्ट्रेशन क्रमाक | |
| ७ | वस्तू व सेवा कर नोंदणी क्रमांक | |
| ८ | व्यवसाय कर नोंदणी प्रमाणपत्र | |
| ९ | साफसफाईच्या व्यवसायाच्या अनुषंगाने कामगार व अन्य बाबींकरिता केंद्र/राज्य शासनाच्या संबंधित विभागाने निर्गमित केलेले कोणतही प्रमाणपत्र/परवाना (किमान ३ वर्ष) | |
| १० | संस्थेचे /कंपनीचे/मालकाचे आयकर Pan Card क्रंमांक (प्रत ) व आधारकार्ड | |

१. दरपत्राक मंजूर करण्याचे सर्व अधिकार खरेदी समितीकडे राखीव आहे हे मला मान्य आहे.

२. या दरपत्रकातील अटी व शर्ती मला संपुर्णपणे मान्य आहेत. तसेच अटी व शर्तीबाबत माझी कोणतीही तक्रार नाही.

३. दरपत्रकासमवेतच्या करारनाम्यतील सर्व बाबी मला विनाशर्त मान्य आहे.

४. प्रमाणपत्रो सोबत जोडली आहेत.

निविदाकराची सही
रबर स्टॅपसह

## विवरणपत्र

| अ. क्र. | तपशिल | | % | ड्रेसर | पुर्णवेळ सफाईगार | भोजन सेवक | शिपाई | हलालखोर | मोची | वार्डबॉय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | मुळ वेतन (Basic Pay) | | | 9000 | 10000 | 6500 | 10021 | 9000 | 9000 | 9000 |
| 2 | विशेष भत्ता (Special Allonce) | | | 7482 | 6358 | 7224 | 3250 | 7482 | 5778 | 7482 |
| 3 | एकुण किमान वेतन | A | | 16482 | 16358 | 13724 | 13271 | 16482 | 14778 | 16482 |
| 1 | घरभाडे भत्ता (HRA 5%) | | 5% | 824 | 818 | 686 | 664 | 824 | 739 | 824 |
| | बोनस उपदान 8.33% किमान वेतनावर | | 8% | 1373 | 1363 | 1143 | 1105 | 1373 | 1231 | 1373 |
| | रजा उपदान 1.28 % किमान वेतनावर | | 1% | 211 | 209 | 176 | 170 | 211 | 189 | 211 |
| 4 | एकुण किमान वेतन व भत्ते | B | | 18890 | 18748 | 15729 | 15210 | 18890 | 16937 | 18890 |
| 5 | कर्मचाऱ्यांच्या किमान वेतनातून वजा करावयाच्या कायदेशीर बाबी | | | | | | | | | |
| i | भविष्य निर्वाह निधी (PF 12% एकुण किमान वेतनावर) | | 13% | 1978 | 1950 | 1647 | 1593 | 1950 | 1773 | 1950 |
| | प्रशासकीय दर भनिनि करिता 1.15 % किमान वेतनावर | | | 190 | 188 | 158 | 153 | 190 | 170 | 190 |
| ii | राज्य कामगार विमा योजना @ 3.25% एकुण किमान वेतन व भत्तेवर | | 3.25% | 614 | 609 | 511 | 494 | 614 | 550 | 614 |
| iii | कामगार कल्याण निधी | | 12.5 | 12.5 | 12.5 | 12.5 | 12.5 | 12.5 | 12.5 | 12.5 |
| | कायदेशिर दायित्वाच्या एकुण वजाती | C | | 2794 | 2760 | 2328 | 2252 | 2766 | 2506 | 2766 |
| 6 | एकुण किमान वेतन व भत्ते | D (B+C) | | 21684 | 21508 | 18057 | 17462 | 21656 | 19443 | 21656 |
| 7 | सेवा आकार कंत्राटदाराने नमुद करणे | E | | | | | | | | |
| 8 | कंत्राटदारास अदा करावयाचे एकुण किमान वेतन व भत्ते | F (D+E) | | | | | | | | |
| 9 | सेवा कर (Service Tax ) अ.क्र.8 वर येणाऱ्या रमेवर सेवा कराची आकारणी | G | | | | | | | | |
| 10 | कंत्राटदाराची एकुण किंमत सेवा कर धरुन | H (F+G) | | | | | | | | |
| 11 | देय मासिक परिश्रमिक खालील प्रमाणे | | | | | | | | | |
| 12 | मासिक परिश्रमिकामधुन वजा होणाऱ्या कायदेशिर दायित्वाच्या बाबी | | | | | | | | | |
| i | भविष्य निर्वाह निधी PF 12% एकुण किमान वेतनावर | | 12% | 1978 | 1950 | 1647 | 1593 | 1950 | 1773 | 1950 |
| ii | राज्य कामगार विमा योजना 0.75% | | 0.75% | 124 | 123 | 103 | 100 | 124 | 111 | 124 |
| iii | व्यवसाय कर | | | 200 | 200 | 200 | 200 | 200 | 200 | 200 |
| | कायदेशिर दायित्वाच्या एकुण वजाती | I | | 2301 | 2273 | 1950 | 1892 | 2274 | 2084 | 2274 |
| | कंत्राटी कर्मचाऱ्यास अदा करावयाची रक्कम | J (B-I) | | 19382 | 19235 | 16108 | 15570 | 19382 | 17359 | 19382 |

**नोट :-**

1. www.mahatenders.gov.in या पोर्टलवर वरील दर हे BOQ file मध्ये भरावे लागणार आहेत . त्यासाठी सदर BOQ file मध्ये फक्त एकूण दर **H(F + G ) कंत्राटदाराची एकुण किंमत (सेवाकर, GST व साफसफाई साहित्य धरुन)** भरावेत BOQ Comparison फक्त एकूण दरानुसार होईल.
२. व्यावसायिक निविदा पात्र झालेल्या निविदाकाराणी वरील प्रमाणे विवरण पत्रात दर्शवल्या प्रमाणे त्यांचे दर **E+F+G व H त्यांच्या लेटरहेड** वर Breakup प्रमाणे सादर करावेत.
३. दर भरण्याबाबत काही शंका असल्यास या कार्यालयाशी कार्यालयीन वेळेत व कार्यालयीन दिवशी संपर्क करावा.

कव्हरीग लेटर

जा क्रं-

दिनांक-

**प्रति,**

मा.पोलीस आयुक्त ,
पुणे शहर,

संदर्भ- दिनांक रोजी प्रसिध्द ई-निविदा

विषय- पोलीस आयुक्त कार्यालयाच्या आस्थापनेवर बाहययंत्रणेद्वारे कार्यालयीन शिपाई, प्रमुख आचारी, सहाय्यक आचारी, भोजन सेवक व सफाई कामगार यांची पदे पुरविणेसाठी ई-निविदा

*****

**महोदय,**

उपरोक्त संदर्भ व विषयान्वये पोलीस विभागाकडिल विषयांकित नमूद प्रमाणे कंत्राटी तत्वावर मनुष्यबळ पुरविणेसाठी ई -निविदा दाखल करीत आहे.

तरी ई-निविदा स्विकृत करुन मनुष्यबळ पुरविणेसाठी संधी दयावी ही विनंती.

आपला विश्वासू

(रु.१००/-स्टॅम्पपेपर नोटरी/मॅजेस्ट्रेट यांनी प्रमाणित केलेले व तांत्रिक निविदेसोबत आवश्यक असलेले )

परिशिष्ट-१

प्रतिज्ञापत्र

मी आम्ही ------------------------------------------------ गंभीरतापुर्व असे घोषित करतो की आमची संस्था /एजन्सीचे/फर्म/कंपनीचे नाव वैयक्तिक /स्वायत/खाजगी संस्था/सरकारी विभाग यांचेकडुन काळया यादीत टाकण्यात आलेले नाही.

ठिकाण- सही

दिनांक-

पडताळणी

वरील प्रतिज्ञापत्रातील मजकुर माझ्या/आमच्या माहितीनुसार आणि विश्वासप्रमाणे सत्य आणि बरोबर आहे याची पडताळणी केली आहे . त्यामध्ये काही लपवुन ठेवलेले नाही.

ठिकाण- सही

दिनांक-

(तांत्रिक निविदेसोबत आवश्यक असलेले)

परिशिष्ट-२

स्विकृत प्रमाणपत्र

मी -----------------------------------------------------पद

(संस्था/एजन्सी/फर्म/कंपनीचे नाव)---------------------

असे लिहुन देतो की, मनुष्यबळासाठी निविदा आणि कराराच्या अटी व शर्ती वाचून समजून घेतल्या आहेत आणि त्याद्वारे स्विकारल्या आहेत.

ठिकाण-

सही/-

दिनांक-

**अनुभव प्रमाणपत्र**

(लेटर हेडवर आवश्यक)

परिशिष्ट-३

**ज्याच्यांशी संबंधित असेल त्यांच्यासाठी**

याद्वारे प्रमाणति करण्यात येते की,(संस्था/एजन्सी/फर्म/कंपनीचे नाव) -------------------------------------यांनी आमच्या कार्यालयाकडे/कंपनी/संस्थेकडे दिनांक ते या कालावधीत कत्रांटी कर्मचारी पुरविलेले आहेत.

पुरविण्यात आलेल्या कंत्राटी कर्मचा-यांची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ क्रं | मनुष्यबळाची वर्गवारी | कालावधी | | पुरविण्यात आलेल्या कंत्राटी कर्मचारी संख्या |
|---|---|---|---|---|
| | | पासून | पर्यंत | |
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |
| | | | | |
| | | | | |

कराराच्या कालावधीत पुरवठा केलेल्या कंत्राटी कर्मचारी यांच्या सेवा खराब / चांगल्या /खुप चांगल्या/समाधानकारक आहेत.

सही/शिक्का

**उपलब्ध मनुष्यबळ यादी**

**(लेटर हेडवर आवश्यक)**

परिशिष्ट-४

आमच्या ---------------------------------------------------------------या संस्थेकडे खालीलप्रमाणे मनुष्यबळ उपलब्ध असुन त्यंचा तपशिल पुढील प्रमाणे आहे.

| अ क्रं | कर्मचारी संपुर्ण नाव | संपुर्ण पत्ता व मोबाईल नंबर | वय | शिक्षण | कर्मचारी सही |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

कंत्राटदार स्वाक्षरी

(नेमण्यात येणा-य मनुष्यबळाकडुन घेण्यात येणारे हमी पत्र)

परिशिष्ट-५

मी श्री/श्रीमती ----------------------------------------------------------------------

राहणार ----------------------------------------------------------------------- याद्वारे असे लिहुन देते/देतो की मी मे.------------------------------------------------यांच्या संस्था/ एंजन्सी / फर्म/ कंपनीचे सदस्य असुन ते ------------------ या ठिकाणी ---------------------------------- -------------------या पदावर व रुपये

-------------------------इतक्या मानधनावर कंत्राटी कर्मचरी म्हणुन नेमणूक देणार आहेत व त्यानुसार मी काम करण्यास इच्छुक आहे. म्हणुन स्वेच्छेने हे हमीपत्र लिहून देत असून त्याबाबत माझी मागावून कोणत्याही प्रकारची व कोणा विरुध्द तक्रार राहणार नाही. तसेच नियमित अथवा कामय स्वरुपी शासकिय नोकरीसाठी कार्यालयाकडे/शासनाकडे दावा अथवा खटला दाखल करणार नाही.

ठिकाण-

कंत्राटी कर्मचारी नाव /सही

दिनांक-

समक्ष

कंत्राटदार नाव/सही

पुणे शहर पोलीस आयुक्तालयाच्या आस्थापनेवरील पोलीस ठाणे व पोलीस चौक्यांच्या जागेच्या माहितीचा तपशील

| परि मंडळ | पोलीस स्टेशन व पोलीस चौकी | सि.स.नं/स.नं. | विभागाचे नाव | क्षेत्रफळ (चौमी) |
|---|---|---|---|---|
| | १. खडक | सि.स.नं. ९३१ | शुक्रवारपेठ | ४०० |
| | २. फरासखाना व विश्रामबाग | सि.स.नं. १४६ | बुधवारपेठ | १०३० |
| | ३. समर्थ | सि.स.नं. ४२० | सोमवारपेठ | १३९०० |
| | | सि.स.नं. ४२१ | सोमवारपेठ | १२६८९ |
| | ४. शिवाजीनगर | सि.स.नं. ११५५ FPT No. ८७९ | भांबुर्डा | ३०० |
| | ५. डेक्कन | सि.स.नं. ७५९/७ फा.प्ला.नं. २६० | भांबुर्डा | ९८८ |
| | १. सहकारनगर | सि.स.नं. २८३३ | पर्वती | ४६५ |
| | नवीन इमारत बांधकाम प्रस्तावित | स.नं. ३२/२/१२ ते १६/३ | धनकवडी | १८४० |
| | २. स्वारगेट | सि.स.नं. ४९५ स.नं.२३३ | घोरपडेपेठ | ५०० |
| | ३. भा.विद्यापीठ | स.नं. २६/१अ/७अ, २७/१अ/४४/१ | धनकवडी | १८० |
| | ४. बंडगार्डन | सि.स.नं. २८ नवीन स.नं. ४१९ | वेलस्ली रोड | १३१८.५ |
| | नवीन इमा.बांध.प्रस्ता. | सि.स.नं. ६अ नवीन स.नं.४१९ | फायनान्सरोड | ३३६४.८ |
| | ५. लष्कर | स.नं. ३९१ | लष्कर | ४०८७ |
| | ६. कोरेगावपार्क | सि.स.नं. ११२/२/५ | कोरेगावपार्क | १०९२ |
| | १. कोथरुड | स.नं. १५२/२<br>न.भू.क्र. ९४८ पै. - स.नं. ८४ | कोथरुड | १०६६<br>१८०० |
| | २. वारजे | स.नं. १३३ | वारजे | १११ |
| | ३. उत्तमनगर | स.नं. १५/१/२ घर क्र. ११२२ | उत्तमनगर | २१० |
| | ४. सिहंगडरोड | स.नं.५/१/२+१/४ | वडगाव बु. | २१६ |
| | ५. पर्वती | स.नं. ९३ | लक्ष्मीनगर | २३२.५ |
| | ६. अलंकार | स.नं. ३३ | कोथरुड | ३०० |
| | १. चतु:श्रृंगी | स.नं. २५/१अ/१ | औंध | ५०० |
| | २. खडकी | स.नं. १२४/१ | खडकी | ४९७७ |
| | ३. विश्रांतवाडी | सि.स.नं. २५१५ स.नं. ९५/३ व ९५/२क | येरवडा | ३२५ |
| | ४. येरवडा | स.नं.१९१अ/२अ/१ CTS २१७५ | येरवडा | १२१४० |
| | ५. चंदननगर | स.नं. ३७/२अ/ख | खराडी | ५६२.५ |
| | ६. विमानतळ | स.नं. ११९-२०४-२०५-२०६/१-२०९/१ - नं. ८६ अ | लोहगाव | १८६३.४ |
| | विमानतळ पोस्टे इमा बांधकाम सुरु स.नं. ४५ ब | | वडगावशेरी | २६०० |
| | ७. लोणीकंद | | लोणीकंद | १००० |
| | १. हडपसर | स.नं.९/१(३०६) | हडपसर | ८७७ |
| | दिवाणी कोर्ट प्रलंबित | स.नं. १६५अ | हडपसर | ३००० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | २. मुंढवा | स.नं. ५९/अ/१अ व १ब | मुंढवा | ५०० |
| | ३. लोणीकाळभोर | गट नं. ५१० | लोणीकाळभोर | १००० |
| | ४. कोंढवा | स. नं. ३८/५ब +९ | कोंढवा खुर्द | ८४२ |
| | ५. बिबवेवाडी | सं.नं. ६७०/६७१ | इंदिरानगर,बिबवेवाडी | २३२ |
| | ६. मार्केटयार्ड | | मार्केटयार्ड | १८७.२९ |
| | ७. वानवडी | स.नं. ११२ए, ११७, ११८, १२२ए, १२३, २९७, ३१८ | हडपसर एमआयडीसी | ३१८ |

## पुणे शहर पोलीस आयुक्तालयाच्या आस्थापनेवरील पोलीस वसाहती व पोलीस आयुक्त कार्यालयाच्या जागेचा तपशील

| पोलीस वसाहत | सि.स.नं/स.नं. | क्षेत्रफळ (चौमी) | क्षेत्रफळ एकर |
|---|---|---|---|
| १. खडक | सि.स.नं. ९३० | ६४४४.९ | १ एकर २४ गुंठे |
| २. सोमवारपेठ | सि.स.नं. ४२० | १२६८९.१ | ३ एकर ७ गुंठे |
| | सि.स.नं. ४२१ | | |
| ३. भवानीपेठ | सि.स.नं. १०३६ | १७४०१ | ३ एकर गुंठे |
| ४.शिवाजीनगर | संपूर्ण पोलीस मुख्यालय. | | |
| रिक्रीशन हॉल, पोलीस संकुल- | सि.स.नं. ११५७ फा.प्लॉट नं. ५३२ | ५९४५ | १ एकर १९ गुंठे |
| इमारत क्र. २ व ३, अंगणवाडी- | सि.स.नं. ११५८ फा.प्लॉट नं. ५३३ | ५३९८ | १ एकर १४ गुंठे |
| ईस्टर्न बंगलो, बीडीडीएस, दवाखाना- | सि.स.नं. ११७६ फा.प्लॉट नं. ८७४ | ४२३४० | १० एकर २३ गुंठे |
| कर्मचारी निवास ए ते एफ - | सि.स.नं. ११८६ ब फा.प्लॉट नं. ८७५ पैकी | १४५०० | ३ एकर २५ गुंठे |
| बैठ्याचाळी, १०४, नवीन इमा. - | सि.स.नं. ११७७ फा.प्लॉट नं. ८७६ | ४५५०० | १४ एकर ३५ गुंठे |
| एमटी, हिरकणी, शाळा- | सि.स.नं. ११५६ फा.प्लॉट नं. ८७७ | २५२८९ | ६ एकर १२ गुंठे |
| नॉर्दर्न बंगलो - पोलीस ग्राऊंड, | सि.स.नं. ११६६ फा.प्लॉट नं. ८७८ | ३४३९ | ३४ गुंठे |
| शिवाजीनगर पोस्टे | सि.स.नं. ११५५ फा.प्लॉट नं. ८७९ | ५४८३० | १३ एकर २८ गुंठे |
| ५. स्वारगेट | सि.स.नं. ४९५ स.नं. २३३ | ५६७५७ | १४ एकर ७ गुंठे |
| ६. लष्कर | स.नं. ३९१ | २००० | २० गुंठे |
| ७. गोखलेनगर | सि.स.नं. ३०२४/१ स.नं. २७०/ब ३ + २ फ | १९१०० | ४ एकर ३१ गुंठे |
| | सि.स.नं. ३०२४/८ स.नं. २७०/ब ३+२ फ | | |
| | सि.स.नं. १०४४ | २०२०० | ५ एकर २० गुंठे |

| | | | |
|---|---|---|---|
| | सि.स.नं. १०५७ | ३८८०० | ९ एकर २८ गुंठे |
| ९. खडकी - सध्या बंद | स.नं. १२४/१ | २००० | २० गुंठे |
| १०. खडकी बाजार | स.नं. २७-६०६ ए | ४८७५ | १ एकर |
| ११. विश्रांतवाडी | सि.स.नं. २५१५ स.नं. ९५/२/१/२ व ९५/३ | ३४३८१ | ८ एकर २३ गुंठे |
| १२ पोलीस आयुक्त कार्यालय. | कसबे स.नं. १ व<br>कसबे स.नं. २ | ९०००<br>३४०० | २ एकर १० गुंठे<br>३४ गुंठे |
| १३ पोलीस आयुक्त बंगला | स.नं. ५८ ए- बंगला नं. ११, राणीचा बाग | ६१८० | १ एकर २१ गुंठे |

पुणे शहर पोलीस आयुक्तालयाच्या आस्थापनेवरील वरीष्ठ पोलीस कार्यालयांच्या जागेचा तपशील.

| अ.क्र. | कार्यालय | जागेचे वर्णन | मालकीहक्क | क्षेत्रफळ चौ.मी. |
|---|---|---|---|---|
| १. | अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग | फरासखाना पोलीस ठाणे इमारतीच्या जागेत | | |
| २. | अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग | मध्यवर्ती इमारत, पुणे | सरकारी | १००० |
| १. | पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१ | फरासखाना पोलीस ठाणे इमारतीच्या जागेत | | |
| २. | पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-२ | लष्कर पोलीस ठाणे इमारतीत | | |
| ३. | पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-३ | कोथरुड स.नं.१९/२ वारजे क्षेत्रिय कार्या. | पुणे मनपा | १६१ |
| ४. | पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-४ | येरवडा स.नं. ६ क्षेत्रिय कार्यालय | पुणे मनपा | १६३.४४ |
| ५. | पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-५ | स.नं.२ सावित्रीबाई शिवरकर बहुउद्देशीय सभागृह, वानवडी | पुणे मनपा | ३५९ |
| १. | सहायक पोलीस आयुक्त फरासखाना विभाग | फरासखाना पोलीस ठाणे इमारतीच्या जागेत | | |
| २. | सहायक पोलीस आयुक्त विश्रामबाग विभाग | नारायणपेठ सिटीएस नं. १८८ | पुणे मनपा | १० |
| ३. | सहायक पोलीस स्वारगेट विभाग | स्वारगेट सिटीएस नं. ४९५ | पोलीस विभाग | १२० |
| ४. | सहायक पोलीस आयुक्त लष्कर विभाग | लष्कर पोलीस ठाणे इमारतीत | | |
| ५. | सहायक पोलीस आयुक्त कोथरुड विभाग | एरंडवणा स.नं. ४४ सिटीएस ९४८ | कुमार बिल्डर्स | २० |
| ६. | सहायक पोलीस आयुक्त सिंहगडरोड विभाग | सिंहगड पोलीस ठाणे इमारतीत | | |
| ७. | सहायक पोलीस आयुक्त खडकी विभाग | औंध स.नं. १३९ सिटीएस १०५७ | पोलीस विभाग | २०० |
| ८. | सहायक पोलीस आयुक्त येरवडा | खडकी जीएलआर स.नं. | संरक्षण | ३५४ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | विभाग | २३२ | विभाग | |
| ९. | सहायक पोलीस आयुक्त हडपसर विभाग | मगरपट्टा पोलीस चौकीच्या इमारतीत | | |
| १०. | सहायक पोलीस आयुक्त वानवडी विभाग | खडी मशीन पोलीस चौकी इमारतीत | | |
| ११. | सहायक पोलीस आयुक्त, पुणे मनपा अतिक्रमण | पुणे महानगरपालिका कार्यालय | पुणे मनपा | २० |